गावातच मोफत केवायसी करा ; कष्टकरी संघाची तहसीलदारांकडे मागणी >> पान 2

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या डॅशबोर्डचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन >> पान 3

केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी पर्यटकांशी साधला संवाद >> पान 4

**सुविचार**

मित्रांची निवड काळजीपूर्वक करा, कारण ते आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग असतात.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 252 ■ शुक्रवार, दि. 25 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




रितेश देशमुख हळहळला! 'राजा शिवाजी'च्या कलाकाराचा मृत्यू

आतील पान

# सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित

**नवी दिल्ली: मंगळवार २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देश हादरुन गेलं आहे. या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला असून यानंतर केंद्र सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीने पाकिस्तानमधील भारतीय दूतावास बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने पाकिस्तानसोबत असलेल्या सिंधू नदी पाणी वाटप करार रद्द करण्याची घोषणा केली आहे. दरम्यान हे पाणी करार रद्द करण्याची तयारी सरकार कित्येक वर्षापूर्वीपासून करत असून अखेर आता भारताकडून पाकिस्तानला होणारा सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित करण्यात आले आहे. यामुळे आगामी काळात पाकिस्तानला मोठे परिणाम भोगावे लागणार आहेत.**

पाकिस्तानला होणारा पाणीपुरवठा भारताकडून होत असून यामध्ये सर्वात मोठा वाटा 'सिंधू' या नदीचा आहे. ही नदी मानसरोवर येथून भारताचा टप्पा पार करुन पाकिस्तानमध्ये प्रवेश करते आणि तेथून अरबी समुद्राला जाऊन भेटते. याचप्रकारे जम्मू-काश्मीरमधून चेनाब आणि झेलम या नद्या आणि रावी, बियास आणि सतलज नद्या देखील पाकिस्तानमध्ये प्रवेश करतात. या करारामुळे पाकिस्तानला एकूण पाण्याच्या प्रवाहापैकी सुमारे ८० टक्के पाणी या नद्यांमधून मिळत आहे. मात्र पाकिस्तानकडून सातत्याने होणाऱ्या वाईट वर्तवणुकीमुळे सरकार २०१६ पासूनच पाकिस्तानसोबतचा सिंधू नदी पाणी करार रद्द करण्याच्या तयारीत होता. त्यानंतर नुकतेच झालेल्या पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू नदी पाणी वाटप कराराबाबत टोकाचे



पाऊल उचलले आहे.

सिंधू पाणी करार काय आहे?

१९६० मध्ये पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांनी सिंधू पाणी करारावर स्वाक्षरी केली होती. सिंधू करारनुसार, भारताला रावी, बियास आणि सतलज या तीन पूर्वेकडील नद्यांचे पाणी मिळते तर पाकिस्तानला चिनाब, झेलम आणि सिंधू या पश्चिमेकडील नद्यांचे पाणी मिळते. करारानुसार, भारत आणि पाकिस्तान हे पाणी जलविद्युत आणि सिंचन यासारख्या घरगुती कारणांसाठी वापरू शकतात. तर भारत विविध कारणांसाठी पश्चिमेकडील नद्यांवर ३.६ दशलक्ष एकर फूट पाणी साठवू शकतो.

सिंधू पाणी करार रद्द केल्याने पाकिस्तानवर काय होणार परिणाम?

सिंधू नदी पाकिस्तानला दरवर्षी १५४.३ दशलक्ष एकर फूट पाणी पुरवते. पाकिस्तान सिंचन, शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी या पाण्याच्या पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

सिंधू नदी पाणी वाटप करारात अडथळा आल्यास पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण उपजीविकेचा महत्त्वाचा घटक असलेल्या कृषी >> पान २

## भारताने फटकारल्यानंतर पाकिस्तानला आली जाग, पहलगाम हल्ल्याबाबत इस्लामाबादमध्ये उच्चस्तरीय बैठका!

**इस्लामाबाद :** पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत भारतासह जगभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भारताच्या शेजारी राष्ट्रांसह अमेरिकेनंदेखील भारतासह ठामपणे उभे असल्याचे स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या ७ दहशतवाद्यांपैकी काही पाकिस्तानी असल्याचे स्पष्ट झाले आहे. यानंतर भारत सरकारनं पाकिस्तानला परखड शब्दांत सुनावत मोठ्या घोषणा केल्या. त्यात सिंधु जल करार स्थगित करणे, पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेशबंदी अशा घोषणांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर आता पाकिस्तान सरकारला उपरती आली असून उच्चस्तरीय बैठकांचे आयोजन केले जात आहे.

केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयाकडून बुधवारी रात्री उशीरा घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत भारताकडून घेण्यात आलेल्या पाच महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती दिली. त्यात सिंधु जल करार रद्द करणे, पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेश बंदी, भारतातील पाकिस्तानी नागरिकांनी ४८ तासांत मायदेशी परत जावं, पाकिस्तानातील भारतीय दूतावासातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या कमी करणे आणि पाकिस्तानातील भारतीयांनी लवकरात लवकर भारतात परतणे अशा निर्णयांचा यात समावेश आहे.

दरम्यान, भारताने घेतलेल्या या निर्णयांवर पाकिस्तानकडून निषेधाचा सूर आळवण्यात आला आहे. पहलगाम हल्ल्यात आपला कोणताही हात नसल्याचे सांगत पाकिस्तानने याआधीच या सर्व प्रकरणातून अंग काढून घेण्याचा प्रयत्न चालवला आहे. त्यात आता भारताने एकतर्फी पद्धतीने सिंधु जल करार रद्द करणे चुकीचे अल्याचा कांगावा पाकिस्तानने सुरू केला आहे. हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावे भारताने सादर करावेत, अशीही मागणी पाकिस्तानकडून करण्यात आली आहे.

### हल्ल्यावेळी अंगावर जे कपडे, त्याच कपड्यांनी आसावरीकडून
## वडिलांना अग्नी, संतोष जगदाळेंवर अंत्यसंस्कार

पुणे : जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यामध्ये पुण्यातील जिवलग मित्र संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गनबोटे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या निष्पापांच्या मृत्यूमुळे पुणे शहरावर शोककळा पसरली आहे. सुट्टीची मजा घ्यायला आणि फिरायला गेलेल्या कुटुंबाचा आनंद क्षणात हिरावला गेल्याने दोन्ही कुटुंबे धक्क्यात आहेत. पहलगाममध्ये मंगळवारी (दि.२३) झालेल्या हल्ल्यात संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गनबोटे यांना दहशतवाद्यांनी गोळ्या घातल्या. दरम्यान आज दोन्ही मित्रांवरती अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. हल्ल्यावेळी अंगावर जे कपडे होते, त्यावरती रक्ताचे शिंतोडे पडले होते, त्याच



कपड्यांनी आसावरीकडून वडिलांना अग्नी दिला आहे. संतोष जगदाळेंवर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गनबोटे या दोघांचा मृत्यू झाला. हे दोघेजण फार जवळचे लहानपणापासूनचे मित्र होते. मंगळवारी दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. दोघांचेही पार्थिव त्यांच्या पुण्यातील घरी आणण्यात आले. पुण्यामध्ये त्यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. संतोष जगदाळे यांची हत्या त्यांची मुलगी आणि पत्नीच्या डोळ्यासमोर करण्यात आली. आसावरीच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र हरपल्यामुळे संतोष जगदाळे यांच्या मुलीला मोठा धक्का बसला.

संतोष जगदाळे यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी आणि त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी नातेवाईकांनी गर्दी केली होती. संतोष जगदाळे यांच्या मित्रांना देखील अश्रू अनावर झाले आहेत. सकाळपासूनच संतोष जगदाळे >> पान २

## पाकिस्तानचे अधिकृत ट्विटर हँडल भारतात ब्लॉक

नवी दिल्ली : जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांच्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर भारत सरकारने पाकिस्तान विरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. भारत सरकारने सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित केला आहे. पाकिस्तानच्या नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. पाकिस्तानच्या दिल्लीतील दुतावासाचे कर्मचारी कमी करण्याचा निर्णय घेतला. या पाठोपाठ केंद्र सरकारने पाकिस्तान सरकारचे अधिकृत एक्स हँडल अर्थात ट्विटर हँडल ब्लॉक केले आहे.लवकरच पाकिस्तानशी संबंधित अनेक सोशल मीडिया अकाउंट भारतात ब्लॉक होणार असल्याचे वृत्त आहे. याआधी जुलै २०२२, ऑक्टोबर २०२२ आणि मार्च २०२३ मर्यादीत काळासाठी केंद्र सरकारने पाकिस्तान सरकारचे अधिकृत एक्स हँडल अर्थात ट्विटर हँडल ब्लॉक केले होते.

एक्स अर्थात ट्विटरच्या धोरणानुसार न्यायालयाचे आदेश किंवा कायदा अंमलबजावणी संस्थांकडून आलेल्या विनंत्या यासारख्या वैध कायदेशीर मागण्यांना प्रतिसाद म्हणून प्लॅटफॉर्म विशिष्ट हँडल विशिष्ट भागात ब्लॉक करतो. या धोरणांतर्गत एक्स प्लॅटफॉर्मने पाकिस्तान सरकारचे अधिकृत एक्स हँडल अर्थात ट्विटर हँडल भारतात ब्लॉक केले आहे.

पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तान विरोधात कठोर कारवाई सुरू केली आहे. या अंतर्गत भारताने सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित केला आहे. अटारी सीमेवरुन भारत – पाकिस्तान दरम्यानचे येणे – जाणे बंद केले आहे. पाकिस्तानच्या नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. पाकिस्तानच्या दिल्लीतील दुतावासाचे कर्मचारी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय सैन्याच्या तिन्ही दलांना अती दक्षतेचा इशारा दिला आहे.

## "कटातील सर्वांना कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल" पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मोठा इशारा

नवी दिल्ली : पहलगाममधील पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे देशात सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या हल्ल्याविरुद्ध सरकार आक्रमक झाले असून, हा रक्तरंजित कट रचणाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी, तपास यंत्रणानी युद्धपातळीवर काम करायला सुरुवात केली आहे. दरम्यान, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी (इश ऱीाहीर श्रद्ग) यांनी पहलगाम हल्ल्याबद्दल मोठे भाष्य केले आहे.

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याविरुद्ध सरकारने कारवाईला सुरुवात केली आहे. काही ठिकाणी लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाल्याचीही माहिती आहे. पहलगामच्या हल्ल्यात हिंदू पर्यटकांना टार्गेट बनवण्यात आले. या हल्ल्यानंतर लोकांमध्ये प्रचंड असा संताप हा बघायला मिळतोय. या हल्ल्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काय वक्तव्य करतात यावर संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. त्यामुळे मोदी यांनी पहलगामवरील हल्ल्याची माहिती मिळताच विदेश दौरा अर्धवट सोडत, भारत गाठले आणि त्यांनी विमानतळावरच अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. ज्यात अनेक महत्वाच्या गोष्टींवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर आज बिहार येथील भाषणात पंतप्रधान मोदी यांनी थेट इशाराच दिलाय.

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा मोठा इशारा

पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये बोलताना म्हणाले की, २२ एप्रिल रोजी जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला. दहशतवाद्यांनी ज्या क्रूरतेने निष्पाप लोकांना मारले त्यामुळे संपूर्ण देश दु:खी आहे. संपूर्ण राष्ट्र सर्व पीडित कुटुंबांच्या दु:खात त्यांच्यासोबत आहे. या हल्ल्यात कोणीतरी आपला मुलगा, भाऊ किंवा पती गमावला आहे. देशाच्या शत्रूंनी भारताच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे धाडस केले आहे.


या भाषणात मोदी पुढे म्हणाले, ''दहशतवाद भारताच्या आत्म्याला तोडू शकत नाही. दहशतवाद्यांचे उरलेले अड्डे नष्ट करण्याची वेळ आली आहे. १४० कोटी भारतीयांची इच्छाशक्ती दहशतवाद्यांचे कंबरडे मोडेल.'' पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या कटातील सर्वांना कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल असा इशारा देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भाषणाद्वारे दिला आहे.



## विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचा बुलढाणा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे दि. २५ व २६ एप्रिल २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौरावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.



शुक्रवार दि. २५ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता अहिल्यानगर येथून शेगांव संस्थान विश्रामगृह, ता.शेगाव जि. बुलढाणा येथे आगमन व मुक्काम. शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ वाजता गजानन महाराज मंदिर, शेगांव येथे दर्शन. सकाळी ८.३० वाजता शेगाव येथून अमरावतीकडे प्रयाण करतील.

## आतंकवाद्यांचे मेसेज समजण्यासाठी उर्दू सुद्धा शिकवली पाहिजे- संजय गायकवाड

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जे कोणी पक्ष लोक म्हणतात की हिंदी शिकवली पाहिजे नाही. हिंदी राष्ट्रभाषा नाही. ज्यावेळेला युपी बिहाला दिल्लीमध्ये जातो किंवा इतर मराठी शिवाय आम्हाला कोणतीच भाषा आली नाही. तर आमच्या लोकांनी तिकडे काय करावं. आज देशांमध्ये कुठेही गेला तरी हिंदीमध्ये बोलल्या जात इंग्लिश मध्ये बोलतात. छत्रपती संभाजी राजांना १६ भाषा अवगत होत्या. मग तुम्ही त्यांच्या विचारांना लात मारणार आहात का ? शिवाजी महाराज राजमाता जिजाऊ हे बहुभाषिक होते. त्यांना सगळ्या भाषांच्या यायच्या. त्यांनी भाषा शिकून चूक केल? अरे आज आमचं पोरग महाराष्ट्राच जगात फिरल तर त्याला जगाच्या सगळ्या भाषा आल्या पाहिजे. एवढंच काय हिंदीच नाही तर उर्दू भाषा पहिल्या वर्गापासून शिकवल्या गेली पाहिजे. अशा आतंकवाद्यांचे मेसेज जातात ना आपल्याला उर्दू समजत नाही म्हणून पकडला जात नाही उर्दू पण शिकवली पाहिजे.



## एमडी खरेदी विक्री करणारे दोन इसम पोलिसांच्या ताब्यात



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** एमडीची खरेदी विक्री करणाऱ्या दोन आरोपींवर कारवाई करत दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात अजनी पोलीसांना यश आले आहे. नागपूरच्या अजनी पोलीस स्टेशनच्या हद्दीत वंजारी नगर पाण्याच्या टाकीजवळ दोन इसम दुचाकीने एमडीची विक्री करण्याकरिता येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. रात्री च्या सुमारास पोलिसांनी सापळा रचून दोन इसमांना ताब्यात घेऊन त्याची अंग झडती घेतली असता त्यांच्याकडून पाच ग्रॅम एमडी ड्रग्स जप्त करण्यात आलं. युगल नरखेडे आणि शेख जावेद असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून पाच ग्रॅम एमडीसह दोन दुचाकी वाहन असा एकूण दोन लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## अतिरेक्यांची माहिती द्या, वीस लाख रुपये मिळवा

श्रीनगर: जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे अतिरेक्यांच्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पहलगाम अतिरेकी हल्ल्याशी संबंधित तीन अतिरेक्यांची रेखाचित्रे प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अतिरेक्यांविषयी ठोस माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल. माहिती खरी असल्याचे आढळले तर अतिरेक्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल.

## सार्वभौमत्वावर हल्ला !

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्याने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्ल्याला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला असण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी. आज जरी हा दहशतवादी हल्ला भारतात झाला असला तरी दहशतवाद ही केवळ भारताचीच समस्या नाही तर ती वैश्विक समस्या आहे. दहशतवाद आज जगातील प्रत्येक देशाचे दार ठोठावत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशांनाही दहशतवादाची झळ बसली आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल तर जगातील सर्व देशांना एकत्र यावेच लागेल. पाकिस्तान सारखा देश जो सातत्याने दहशतवादाला प्रोत्साहन देतो, दहशतवाद्यांना मदत करतो अशा देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने कारवाई करावी. पाकिस्तान सारख्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने आर्थिक निर्बंध आणावेत. प्रसंगी त्या देशांवर बहिष्कार टाकून त्यांची कोंडी करावी. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांची कोंडी केल्याशिवाय दहशतवाद संपणार नाही. अमेरिकेसारख्या सुपर पॉवर देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

# गावातच मोफत केवायसी करा

## कष्टकरी संघाची तहसीलदारांकडे मागणी

दैनिक आपला विदर्भ
■ देवानंद सानप

लोणार : शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी गरजेचे असलेले आधार प्रमाणिकरण (KYC) प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. ही समस्या लक्षात घेता, कष्टकरी संघाचे अध्यक्ष सागर पनाड यांणी तहसीलदारांना निवेदन देत गावागावातच मोफत केवायसी करण्यासाठी महसूल कर्मचाऱ्यांमार्फत मोहीम राबवण्याची मागणी केली आहे.

सध्या पीएम किसान, संजय गांधी निराधार, भारत गॅस, बँक केवायसी अशा अनेक योजनांसाठी




लाभार्थ्यांना शहरात जाऊन केवायसी करावी लागते. या प्रक्रियेत कोणतेही अधिकृत शुल्क नसताना, २०० ते २५० रुपये वसूल करण्यात येत आहेत, असा आरोप कष्टकरी संघाने केला आहे. यामुळे आर्थिक, शारीरिक

शेतकरी , कष्टकऱ्यांची (आधार प्रमाणीकरण ) KYC साठी होणारी परवड कष्टकरी संघाने निवेदनातुन मांडली असुन त्यांची मागणी रास्त आहे या संदर्भाने २८ एप्रील सोमवारी या संदर्भात काम करणाऱ्यांची मिटींग बोलवली असुन KYC बाबद लेखी कळविण्या येईल
**–भुषण पाटील**
**तहसीलदार लोणार**

व मानसिक त्रास वाढत आहे. कष्टकरी संघाने निवेदनात म्हटले आहे की, महसूल विभागातील कर्मचारी गावागावात जाऊन मोफत केवायसी करतील असा लेखी आदेश ७ दिवसांच्या आत निर्गमित करावा. अन्यथा, कष्टकरी शेतकरी व शेतमजुरांना घेऊन मोठ्या प्रमाणावर तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे निवेदनावर अध्यक्ष सागर पनाड यांच्या सह भाऊराव भालेराव, गजानन भानापुरे, महीपंत वाणी यांच्या स्वाक्षऱ्या असुन कष्टकरी जनतेच्या न्याय मागणी साठी होणाऱ्या या आंदोलनामुळे कुठल्याही पेचप्रसंगास निर्माण झाल्यास तहसीलदार जबाबदार राहतील, असे निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. संघाने शेतकऱ्यांच्या व कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारण्याची तयारी दर्शवली असून, प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.

पान १ वरून...

### सिंधू नदी पाणी वाटप करार

क्षेत्रावर मोठा परिणाम होणार आहे.

कमी पाण्याची उपलब्धतेमुळे पीक उत्पादनात घट, अन्नटंचाई आणि शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण भागात आर्थिक अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानची होणार कोंडी

सिंधू जल करार स्थगित करण्यात आल्यानंतर आता पाकिस्तान पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी तरसावे लागणार आहे. खरं तर, १९४८ मध्ये स्वातंत्र्यानंतर, भारताने आपल्या दोन प्रमुख कालव्यांचे पाणी थांबवले होते. यामुळे पाकिस्तानी पंजाबमधील १७ लाख एकर जमीन पाण्याची तहानलेली होती. यानंतर, जागतिक बँकेने मध्यस्थी केली आणि दोन्ही देशांमधील सिंधू पाणी करार पूर्ण केला. आता भारताच्या निर्णयानंतर पाकिस्तानला पुन्हा एकदा गंभीर पाणी संकटाचा सामना करावा लागू शकतो.

पाकिस्तानची जीवनदायनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्यावर भारताचे नियंत्रण येताच तेथील लोकांना पाण्यासाठी वंचित राहावे लागणार आहे. पाकिस्तानची ८० टक्के लागवडीयोग्य जमीन (१६ दशलक्ष हेक्टर) सिंधू नदीच्या पाण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी घेतलेल्या या कठोर निर्णयामुळे पाकिस्तानची मोठी कोंडी होणार आहे.

### हल्ल्यावेळी अंगावर जे कपडे,

यांच्या नातेवाईकांनी त्यांच्या घरी मोठी गर्दी केली आहे. आज त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. आज सकाळी शरद पवार यांच्यासमोर संतोष जगदाळेंची पत्नी आणि मुलीने टाहो फोडला. यावेळी आसावरी जगदाळे हीने या हल्ल्याचा थरार शरद पवारांना सांगितला. आसावरी जगदाळेची अवस्था पाहून उपस्थित नागरिकांना देखील अश्रू अनावर झाले. फॅमिलीसोबत सुट्टी इन्जॉय करण्यासाठी गेलेल्या संतोष जगदाळेंची कुटुंबीयांसोबतची ही सहल अखेरची ठरली. हल्ल्यावेळी अंगावर जे कपडे होते, त्यावरती रक्ताचे शिंतोडे पडले होते, त्याच कपड्यांनी आसावरीकडून वडिलांना अग्नी दिला आहे. संतोष जगदाळेंवर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

आसावरीसोबत तिचे वडील संतोष जगदाळे, आई प्रगती जगदाळे, त्याचसोबत काका कौस्तुभ गनबोटे आणि त्यांची पत्नी संगीता गनबोटे हे काश्मिरमध्ये सुट्ट्या एन्जॉय करण्यासाठी गेले होते. यामधील कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे यांची दहशतवाद्यांनी हत्या केली. जगदाळे कुटुंबीय पुण्यातील कर्वेनगर परिसरात राहतात. तर गणबोटे कुटुंबीय हे पुण्यातील रास्ता पेठेत राहतात. वडील आणि काकांना गमावल्यामुळे आसावरीसोबत त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम इथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झालाय. हल्ल्यात महाराष्ट्रातील एकूण ६ पर्यटकांचा मृत्यू झालाय. यात डोंबिवलीच्या तिघांचा समावेश आहे. तर पुण्यातील दोन आणि पनवेलच्या एका पर्यटकाचा मृत्यू झालाय. डोंबिवलीचे अतुल मोने, संजय लेले आणि हेमंत जोशी यांचा या दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालाय.

## हिमालयाखालील भारतीय प्लेटचे दोन तुकडे, नवीन संशोधनाने खळबळ

नवी दिल्ली : हिमालयाच्या खाली भारतीय टेक्टॉनिक प्लेट सरकत नसून ती खोलवर दोन भागांत विभागली जात असल्याचा धक्कादायक शोध नवीन संशोधनातून समोर आला आहे. सॅन फ्रान्सिस्को येथील एका मोठ्या परिषदेत सादर केलेल्या या संशोधनात दिसून आले की, ही प्लेट सुमारे १०० किलोमीटर खोलीवर डिलॅमिनेशन प्रक्रियेतून जात आहे. चीनच्या ओशन युनिव्हर्सिटीच्या लिन लियू यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांनी भूकंपीय इमेजिंगद्वारे ही माहिती उघड केली. या शोधामुळे भूगर्भशास्त्रज्ञांचा भारतीय प्लेटबद्दलचा दृष्टिकोन बदलला आहे आणि यामुळे दक्षिण आशियातील भूकंपाचा अंदाज बांधण्यात मदत होऊ शकते.

यापूर्वी भारतीय प्लेट आशियाखाली सरकत आहे,असे मानले जात होते. ज्यामुळे हिमालयाची उंची हळूहळू वाढत आहे. परंतु, लिन लियू आणि त्यांच्या टीमने तिबेटमधील ९४ भूकंपीय केंद्रांवरील डेटाचा अभ्यास केलाय. त्यानंतर ए-वेव्ह, शीअर वेव्ह आणि पी-वेव्हच्या आधारे प्लेटची ३ प्रतिमा तयार केली. यातून असे दिसून आले की प्लेटचा काही भाग अखंड आहे, तर काही भाग प्रचंड दबावामुळं फुटत आहे. खालचा दाट भाग मॅंटलमध्ये खेचला जात आहे, तर वरचा भाग पुढं सरकत आहे. ही डिलॅमिनेशन प्रक्रिया दुर्मिळ आहे.

तिबेटच्या पठारावरील भूकंप आणि भेगा यासारखे पृष्ठभागावरील पुरावे या शोधाला पुष्टी देतात. तसेच, स्थानिक झऱ्यांमध्ये हेलियम-३ वायूचे उच्च प्रमाण आढळले आहे, जो पृथ्वीच्या खोल भागातून येतो.

हा शोध केवळ वैज्ञानिक समज वाढवत नाही, तर दक्षिण आशियातील भूकंपाचा अंदाज बांधण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. टेक्टॉनिक प्लेटच्या हालचालींचे सुधारित ३डी मॉडेल, भुकंपाचा अचूक अंदाज यामुळे मिळू शकतो. त्यावरून सुरक्षिततेचे उपाय, पृथ्वीच्या विकसनशील रचनेचे स्पष्ट चित्र मिळण्यास मदत होईल. हिमालय, भारतीय प्लेट, टेक्टॉनिक, डिलॅमिनेशन, भूकंपीय इमेजिंग, तिबेट, भूकंप, हेलियम-३, संशोधन, ३ मॉडेल.

# नराधमास २० वर्षाचा सश्रम कारावास

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अल्पवयीन मतिमंद मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीस वीस वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व तेरा हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठविण्यात आली आहे.

मलकापूर अतिरिक्त जिल्हा न्यायालयाचे विशेष न्यायाधीश तथा अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस व्ही जाधव यांनी हा गुन्हेगारांना जरब बसविशणारा निकाल दिला आहे.

या खटल्याची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे–

पीडित मतिमंद मुलगी शौचालयासाठी जात होती. तेव्हा आरोपी सुरेश भगवान संबारे (राहणार बेलाड, तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा)याने तिला पकडून झोपडीत नेत तिच्यवर लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाणे येथे पीडीतेच्या आईने फिर्याद दिली.यावरून मलकापूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी आरोपीला अटक करून विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. आरोपी हा अटकेपासून कारागृहात होता.

सरकार पक्षातर्फे एकूण पंधरा साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी पिडीता, डॉक्टर, पीडितेची आई, तपास अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. या साक्षी ग्राह्य धरून आरोपी सुरेश भगवान संबारे याचे विरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे शैलेश हरिहर जोशी विशेष सरकारी अभियोक्ता यांनी केलेला युक्तिवाद प्रभावी ठरला. आरोपी सुरेश भगवान संबारे यास पोक्सो कायद्याचे कलम ६ नुसार २० वर्षाची शिक्षा व पाच हजार रुपये दंड न भरल्यास, ६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा, कलम ४ नुसार १०वर्षे शिक्षा व ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३महिने सश्रम कारावासाची शिक्षा तसेच कलम १० नुसार ५ वर्षे शिक्षा २ हजार रुपये दंड,

दंड न भरल्यास एक महिना सश्रम कारावासाची शिक्षा कलम १२ नुसार दोन वर्षे शिक्षा व एक हजार रुपये दंड दंड न भरल्यास एक महिना सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. दंडाची एकूण रक्कम १३ हजार रुपये आरोपीकडून वसूल करून पीडितेस देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलढाणा यांना पीडित नुकसान भरपाई योजनेअंतर्गत अतिरिक्त नुकसान भरपाई ठरवुन पिडीतेस देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. सदर प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक संजय गंगाराम ठाकरे यांनी केला.

# रितेश देशमुख हळहळला! ‘राजा शिवाजी’च्या कलाकाराचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या अभिनेता आणि दिग्दर्शक रितेश देशमुख यांच्या ‘राजा शिवाजी’ या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे चित्रीकरण साताऱ्यात सुरू आहे. मात्र, शूटिंगदरम्यान एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून युनिटमधील एक ज्युनिअर आर्टिस्ट नदीत बुडून मरण पावला आहे. या घटनेने संपूर्ण टीमवर शोककळा पसरली असून रितेश देशमुखने काही काळासाठी चित्रीकरण थांबवले आहे.

घटनेतील मृत व्यक्तीचे नाव सौरभ शर्मा असून तो राजस्थानच्या जोधपूर येथून आपल्या स्वप्नांचा पाठलाग करत मुंबईत आला होता. तो या चित्रपटात डान्स आर्टिस्ट म्हणून काम करत होता. घटनेनंतर मुंबई फिल्म कंपनीने अधिकृत निवेदन जाहीर करत घटनेला दुजोरा दिला आहे.

कसं घडलं हे दुर्घटनाग्रस्त अपघात? :

२२ एप्रिल रोजी संध्याकाळी पॅकअपनंतर काही कलाकार नदीपात्रात पोहण्यासाठी गेले होते. हळदीच्या सीनमुळे अंगावर हळद लागल्याने अंघोळीसाठी हे कलाकार नदीत उतरले. मात्र, नदीत असलेल्या भोवऱ्याचा अंदाज न आल्याने सौरभ वाहून गेला. त्या जागी तीन खोल भोवरे असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.




घटना कळताच रितेश देशमुख, जिनेलिया देशमुख आणि नृत्यदिग्दर्शक रेमो डिसुझा यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक पोहणारे, ड्रोन आणि प्रशासनाच्या मदतीने शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. रितेश देशमुखने साताऱ्याचे जिल्हाधिकारी पाटील यांच्याशी संपर्क साधत मदतीची मागणी केली.

मुंबई फिल्म कंपनीचे अधिकृत निवेदन :

“ही अत्यंत दुर्दैवी घटना असून आम्ही सौरभच्या कुटुंबीयांशी सातत्याने संपर्कात आहोत. शोधकार्य अजूनही सुरू आहे. घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन पुढील चित्रीकरण स्थगित केलं आहे.”

जिथे ही घटना घडली त्या संगम माहुली नदीपात्रात याआधीही भोवऱ्यांमुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे स्थानिकांनी सतर्कतेचं आवाहन केलं आहे. सौरभचं मृतदेह शोधण्यासाठी प्रयत्न सुरूच असून नेटकऱ्यांनीही सोशल मीडियावरून सौरभसाठी प्रार्थना केली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले.
मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### मौजमजेसाठी मोटारसायकलची चोरी करणाऱ्या अल्पवयीन आरोपींना अटक, १३ गुन्ह्यांची उकल





दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** मौजमजेसाठी मोटार सायकल चोरी करुन पेट्रोल संपेपर्यंत वापरणाऱ्या दोन चोरट्यांना ताब्यात घेत नेरुळ पोलिसांनी १३ गुन्ह्यांची उकल केली आहे. नेरुळ पोलीस ठाण्यात मोटार सायकल चोरी प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपास करत असताना तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार टाटा नगर झोपडपट्टी विभागात सापळा रचत दोन अल्पवयीन तरुणांना ताब्यात घेतले होते. चौकशी दरम्यान दोघांनी मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिलेय. अधिक चौकशी केली असता एकूण १३ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलीसांना यश आले असून सर्व १३ मोटारसायकल देखील पोलिसांनी हस्तगत केल्यात.

### मालोजीराजे भोसले यांच्या समाधीस्थळावरील अनधिकृत अतिक्रम काढण्यासाठी, आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वखालील रास्ता रोको आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**इंदापूर/प्रतिनिधी :** इंदापूर शहरात असलेल्या मालोजीराजे भोसले यांच्या समाधीस्थळावरील अनधिकृत अतिक्रम काढण्यासाठी, सकल हिंदू समाजाच्या, वतीने आमदार गोपीचंद पडळकर, सागर बेग यांच्या नेतृत्वखालील इंदापूर तालुक्यातील गलांडवाडी येथे आज भर दुपारी रास्ता रोको करण्यात आला होता, भर उन्हात तब्बल तीन तास हा रास्ता रोको सुरू होता. लेखी आश्वासन द्या तरच आम्ही आंदोलन मागे घेऊ, असा पवित्रा आंदोलकांनी घेतल्यामुळे या ठिकाणी प्रशासनाचे अधिकारी व आंदोलकात काही वेळ वाद निर्माण झाला होता. मात्र याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोन आमदार पडळकर यांना आल्यानंतर पडळकर यांनी तो स्पीकर फोन ऑन करून सर्व आंदोलकांना ऐकवला व फडणीसांच्या आश्वासनानंतर हे आंदोलन तूर्तास मागे घेण्यात आले.

### खालापूर पोलीस ठाणे हद्दीत मुंबई-पूणे द्रूतगती महामार्गवर दरोडा टाकणाऱ्या आरोपीला पोलिसांनी केली अटक



**रायगड/प्रतिनिधी :** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत मुंबई-पूणे द्रूतगती महामार्गवर दरोडा टाकणाऱ्या आरोपीला खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे आणि पोलीस अंमलदार यांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग करत गुन्हेगाराला अटक केली आहे. जगदीश उर्फ लांड्या लक्ष्मण पवार असे आरोपीचे नाव आहे. पुढील तपास पोलिस करत आहेत.

### भाऊ दूध आणायला गेला, तोपर्यंत ९ वर्षांच्या मुलाला मृत्यूने गाठले, कोल्हापुरातील मन हेलावणारी घटना!

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यातील आरे गावात एक मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. इथं एका ९ वर्षांच्या बालकाचा दुर्दैवी अंत झाला आहे. संबंधित मुलाचे आई वडील कामानिमित्त बाहेर गेले होते. त्याचा मोठा भाऊ दूध आणायला गेला होता. यावेळी ९ वर्षांचा मुलगा घरासमोर जिन्याला बांधलेल्या झोपाळ्यावर खेळत होता. पण भाऊ दूध घेऊन येईपर्यंत मुलाचा मृत्यू झाला आहे. हा धक्कादायक प्रकार उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली.

# उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या डॅशबोर्डचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांचा अद्ययावत तपशील एका ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने ''डॅशबोर्ड'' विकसित करण्यात आला आहे. याचे उद्घाटन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आले. याप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, उपसचिव प्रताप लुबाळ, उपसचिव अशोक मांडे, उपसचिव संतोष खोरगडे, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर (ऑनलाइन) उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा म्हणाले, या डॅशबोर्डमध्ये विद्यापीठांशी संबंधित प्रवेश प्रक्रिया, निकाल, शिष्यवृत्ती, वसतिगृहे, शुल्क आणि महाविद्यालयांशी संबंधित संलग्नता व शैक्षणिक सुविधा तसेच सार्वजनिक ग्रंथालय यांची माहिती समाविष्ट आहे. या डॅशबोर्डवर २६ सार्वजनिक विद्यापीठे व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा समावेश असून भविष्यात राज्यातील सर्व खाजगी व सार्वजनिक विद्यापीठांचा समावेश डॅशबोर्डमध्ये करण्यात येणार आहे. सदर डॅशबोर्ड उच्च व तंत्र शिक्षण विभागाबरोबरच सर्वसामान्य जनतेसाठीही उपलब्ध आहे.

या डॅशबोर्डमधील माहितीचे विश्लेषण करून शैक्षणिक विषयांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यास तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मोलाची मदत होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना व पालकांना त्यांच्या शैक्षणिक बाबींकरिता खात्रीशीर अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे. या माहितीच्या विश्लेषणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजित आहे. असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी माहिती दिली. अधिक माहिती :https://dashboardhtedu.maharashtra.gov.in/home उपलब्ध आहे.

# कर्जत जामखेड तालुक्यात भीषण पाणी टंचाई

## तात्काळ उपाययोजना करण्याचे साठी आ. रोहित पवार यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र



दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील कर्जत-जामखेड तालुक्यातील भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. सदर पाणीटंचाईने निवडण्यासठी तातडीच्या उपाययोजना कराव्या, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, कर्जत-जामखेड तालुक्यात यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाई निर्माण झाली आहे. परिणामी, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र संकटाचा सामना करावा लागत आहे.तसेच पशुधनासाठी आवश्यक पाण्याचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. मतदारसंघातील विविध गावांमध्ये दौरा करत असताना नागरिक व ग्रामस्थांकडून या समस्येबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत आहेत. आपणास दिलेल्या संदर्भिय पत्रानुसार आज रोजी पर्यन्त अद्याप एकही गावात शासकीय टँकर सुरू झालेला नाही. सद्यः स्थितीत ४५ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा तीव्र तुटवडा असून, आणखी काही गावांसह वाड्या-वस्त्यांमध्येही लवकरच टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठ्याची आवश्यकता निर्माण होऊ शकते. वाढत्या उन्हामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर, तातडीने पुढील उपाययोजना राबविण्यात याव्यात. पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये त्वरित टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, पुढील संभाव्य टंचाईग्रस्त गावांसाठी टँकर व नियोजन तातडीने पूर्ण करण्यात यावे, जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याचीही तातडीने सोय करण्यात यावी, तालुक्यातील जनतेला गंभीर पाणीटंचाईला सामोरे जावे लागू नये यासाठी तातडीने कार्यवाही करावी, सोबत कर्जत-जामखेड टँकर द्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी केलेल्या गावांची यादी जोडली आहे. तरी तालुक्यातील भीषण पाणीटंचाई लक्षात घेता तातडीने उपाययोजना कराव्या, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे केली आहे.

## पाकिस्तान जलादो च्या घोषणाने पंढरपुरात दहशतवादी हल्ल्याचा निषेध

दैनिक आपला विदर्भ







**पंढरपूर/प्रतिनिधी :** काश्मीर येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये हिंदू पर्यटकांची हत्या करण्यात आली. याच्या निषेधार्थ आज पंढरपूर येथे सकल हिंदुत्ववादी संघटना यांच्या वतीने दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला. पाकिस्तान विरोधी घोषणा देत पाकिस्तान देशाचा झेंडावर जोडे मार आंदोलन करण्यात आले. तसेच पाकिस्तान विरोधी घोषणा देण्यात आल्या. यावेळी विविध संघटनांचे पदाधिकारी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## डोळ्यासमोर वडिलांना गोळ्या घातल्या; आसावरी जगदाळे यांनी सांगितला घटनाक्रम




दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पहेलगामा येथे झालेल्या हल्ल्या नंतर संपूर्ण देश हदरला. दहशतवादी हल्ल्यात पुण्यातील दोघांचा मृत्यू झाला. यात कर्वेनगरच्या संतोष जगदाळे यांचा समावेश होता. संतोष जगदाळे हे कुटुंबीयांसह पहेलगामा येथे फिरायला गेले होते. त्यांच्यासोबत मुलगी आसावरी जगदाळे यादेखील होत्या. आसावरी यांच्या डोळ्यासमोरच अतिरेक्यांनी तिच्या वडिलांवर गोळ्या झाडल्या. त्या ठिकाणी नेमकं काय घडलं होतं हे आसावरी जगदाळे यांनी सविस्तर घटनाक्रम सांगितल आहे. जम्मू-काश्मीरच्या पहेलगामा मध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभगनबोटे या दोन मित्रांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी त्यांच्यावर गोळ्या झाडून हत्या केली. दोघांचेही पार्थिव पहाटे पुण्यात आणण्यात आले. दोघांच्याही पार्थिवावर पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# पंतप्रधान मोदींनी घेतलेला निर्णय महत्त्वपूर्ण

## मंत्री उदय सामंत यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध करतो. तसेच पंतप्रधान मोदींनी याबाबत घेतलेला निर्णय महत्वपूर्ण आहे. असे मत मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केले. माध्यमांशी बोलताना मंत्री उदय सामंत मणाले की, दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर साध्या पद्धतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत करणार आहे. दहशतवादी हल्ला झाल्याने एकनाथ शिंदे यांचे साध्या पद्धतीने स्वागत होईल. भाजप जिल्हाध्यक्षांचा काहीतरी गैरसमज झाला. मी असे बोललो होतो की, प्रत्येकाला पक्ष वाढविण्याचा अधिकार आहे. मी संघटन बांधण्यासाठी ज्यावेळी येतो, त्यावेळी ठाकरे गटातील प्रवेश होतात. भाजप जिल्हाध्यक्षांना काही शंका असेल तर, माझ्याशी बोलावे. मित्रपक्षाला अडचण होईल असे वक्तव्य करणार नाही, महायुतीतील घटक पक्षाच्या कार्यकर्त्यांचे प्रवेश घेणार नाही. महायुतीत श्रेयवादाची गरज नाही. गिरीश महाजन काश्मीर येथे गेलेत. तर, आजच एकनाथ शिंदे ह काश्मीरमध्ये आहेत. काही



जण केवळ टीका करतात. काही जण लंडनला जातात. त्यावर आम्ही टीका केली तर चालेल का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सत्ताधारी फक्त फोटोसेशन साठी काश्मीरला गेले. या संजय राऊत यांच्या टीकेवर बोलताना म्हणाले की, काही लोकांना सकाळीच उठून काहीतरी बोलावं लागतं, प्रसिद्धीत राहिले नाही तर राजकारणाच्या बाहेर जाल ही भीती आहे. वैभव नाईक यांनी विचार करावा, त्यांना माझे आमंत्रण, निमंत्रण आहे. वैभव नाईक यांनी शांत विचार करावा, जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी आमच्या बरोबर यावे, निलेश राणे सुद्धा पक्षवाढीसाठी वैभव नाईक यांना पक्षात घेतील. वैभव नाईक यांना उदय सामंत यांची खुली ऑफर असे मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### कश्मीरमध्ये अडकलेल्या किन्नर लोकांना सुखरूप महाराष्ट्रात आणा, धुळ्यातील किन्नर आखाड्याची मागणी




दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळ्यातील किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वर तथा उपाध्यक्ष पार्वती जोगीसह पाच जण पहलगामपासून ५० किलोमीटरवर आपल्या काही कामासाठी गेल्या होत्या. दहशतवादी हल्ल्यामुळे त्या ठिकाणी अडकले आहेत. तसेच त्यांचे दोन किन्नर जोडीदार हे पहलगाम मध्ये अडकले असून त्या सर्वांची सुखरूप सुटका करून त्यांना महाराष्ट्रात परत आणा अशी मागणी करतच धुळ्यातील किन्नर आखाड्याच्या प्रमुखांनी धुळे जिल्हाधिकारी यांची भेट घेतली असून त्यांच्या तब्येतीची व त्यांना महाराष्ट्रात आणण्याची लवकरात लवकर सोय करावी अशी मागणी त्यांनी करण्यात आली आहे.

तसेच किन्नर आखाड्यातील पदाधिकाऱ्यांनी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात पाकिस्तान विरोधात जोरदार घोषणाबाजी करत पहलगाम येथे झालेल्या आतंकवादी दहशतवादी हल्ल्याच्या कृत्याचा जाहीर निषेध केला आहे. तसेच सामाजिक कार्यकर्त्या प्रभा परदेशी यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत धुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात पाकिस्तानचा ध्वज जाळत झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा शब्दात निषेध केला आहे.

### शनिवार नंतर पूर्व विदर्भातला मिळणार उन्हापासून दिलासा, हवामान विभागाने पूर्व विदर्भात वर्तविला पावसाचा अंदाज



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** मागील काही दिवसांपासून नागपूरसह विदर्भात प्रंचड उन्हाचा प्रकोप सहन करावा लागत आहे. नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने आज आणि उद्या विदर्भातील बहुतेक जिल्हात उष्णतेच्या लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. हिट वेजचा ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे पुढील दोन दिवस तापमान ४५अंश सेल्सिअसच्या पुढे राहण्याचा अंदाज आहे. उत्तर व पश्चिम दिशेने उष्ण वारे वाहत असल्याने विदर्भात तीव्र- उष्णतेची लाट आली असल्याचे हवामान खात्याच्या शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे.

मात्र शनिवारीनंतर वातावरणात काही प्रमाणात बदल अपेक्षित असून शनिवारी रात्री उशिरा पूर्व विदर्भात हलक्या पावसाचा अंदाज आहे. त्या परिस्थितीत तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात येत आहे.

### राणा फाउंडेशनच्या वतीने दहशतवादी हल्ल्याचा निषेध; मृत्यू पावलेल्या भारतीयांना वाहिली श्रद्धांजली




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जम्मू- कश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्याच्या निषेधार्थ बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील महात्मा गांधी उद्यान येथे राणा फाउंडेशन च्या वतीने कॅण्डल लावून शांततेच्या मार्गाने निषेध नोंदवून हल्ल्यात मृत्यू झालेल्या भारतीयांना कॅण्डल लावून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या घटनेमागील जो मास्टर माइंड असेल व जे आरोपी आहेत त्यांना फाशीची शिक्षा द्यावी द्यावी. भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासाठी सर्व राजकीय पक्षातील नेत्यांनी व सर्व समाज बांधवांनी एक होऊन सर्वांनी एक संघ रहाव. सर्वांनी राष्ट्रभक्ती दाखवावी असेही आवाहन राणा फाउंडेशनचे अध्यक्ष दिलीपकुमार सानंदा यांनी केले आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांनी पर्यटकांशी साधला संवाद

## पर्यटकांना सुखरूप घरी पोहोचविण्यासाठी विशेष रेल्वे : पर्यटकांच्या चेहऱ्यावर फुलल हास्य

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जम्मू काश्मिरातील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्यानंतर अडकुन पडलेल्या पर्यटकांची केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी जम्मू-काश्मीरमध्ये जाऊन भेट घेऊन संवाद साधला. पर्यटकांना घरी सुखरुप पोहचविण्यासाठी विशेष रेल्वे गाडीची व्यवस्था करण्यात आल्याचे सांगताच पर्यटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.या पर्यटकांना आज दिल्ली येथे आणण्यात येणार आहे.

जम्मू काश्मिरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांना लक्ष करत दहशतवाद्यांनी गोळीबार केला. यामध्ये २८ भारतीय पर्यटक मृत्युमुखी पडले आहे. मृतकांमध्ये ६ जण हे महाराष्ट्रातील आहेत. शिवाय अनेक पर्यटक जम्मू आणि कश्मीरमध्ये अडकून पडले आहेत. तेथील परिस्थितीमुळे ते भयभीत झाले होते. लवकरात लवकर घराकडे पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून ते आणि त्यांचे कुटुंबीय मागणी करत होते. बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास ४९ पर्यटक जम्मू काश्मिरमध्ये पर्यटनांसाठी गेलेले आहेत. हे सर्व पर्यटक सुखरुप आहेत.

२४ एप्रिलच्या सकाळी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव हे जम्मू-काश्मीरला गेले. पर्यटकांसोबत संवाद साधून सरकार





तुमच्या पाठिशी आहे. घाबरू नका तुम्हाला घरी जाण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने व्यवस्था करण्यात आली आहे. असे पर्यटकांना सांगतात त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. दुपारी ३ वाजता जम्मू काश्मीरवरून हे पर्यटक दिल्लीकडे रवाना होणार होतील. दिल्ली येथे आल्यानंतर संबंधीत पर्यटकांना त्यांच्या घराकडे पोहचणाऱ्या रेल्वेने त्यांना पाठवल्या जाणार आहेत. या सर्व पर्यटकांसाठी विशेष रेल्वे बोगी उपलब्ध करून देण्यात आली आहे. केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाशी अनेक पर्यटकांनी व पर्यटकांच्या नातेवाईकांनी संपर्क साधला होता. त्यांना घरी सुखरुप पोहचविण्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी गृहमंत्र्यांशी संपर्क साधून त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले आहे.

## जिल्हा परिषद बाळखेड शाळा पुरस्काराने सन्मानित

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा महाराष्ट्र शासनाचे या उपक्रमांतर्गत वाकद केंद्रातील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा,बाळखेड ने रिसोड तालुक्यातून तृतीय क्रमांक मिळवून वाकद केंद्रामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. त्या अनुषंगाने वाशिम जिल्हा परिषद मधील वसंतराव नाईक सभागृहामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या हस्ते शाळेचे मुख्याध्यापक गजानन पाचरणे यांच्या वतीने महाराष्ट्र शासन राज्यशिक्षक पुरस्कार विजेते राजू नामदेव मोरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.यावेळी पुरस्कार स्वीकारताना गटशिक्षणाधिकारी बी. एल.कोकाटे केंद्रप्रमुख आत्माराम खंडागळे यावेळी व्यासपीठावर वाशिम जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भुसारी ,उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांची उपस्थिती होती.या गौरव पुरस्कारांमध्ये सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन शाळेचा गौरव करण्यात आला या उपक्रमात बाळखेड शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांमधून तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मधुकर गायकवाड तसेच सरपंच सचिन पऱ्हाड यांनी अभिनंदन केले आहे.

## मोहजाबंदी येथे आग लागून सात लाखाच्या मालमत्तेचे नुकसान

**मोहजाबंदी गावाला सतत आगीची भिती कायम**

दैनिक आपला विदर्भ



**रिसोड/प्रतिनिधी :** तालुक्यातील मोहजाबंदी गाव हे चारही बाजुने घणदाट जंगलाने व्यापलेले आहे.त्यामुळे अनेकदा वणवा पेटल्याने आगीची धग गावा पर्यंत पोहचते,आशातच ता.२१ एप्रिल च्या दुपारी मोहजाबंदी गावाच्या दक्षिण दिशेने गोठ्याला भयंकर आग लागुन सुमारे सात लाखाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे.

मोहजाबंदी येथे २१ एप्रिल च्या दुपारी १२ वाजता ज्ञानेश्वर कुंडलीक काळे,फकीर मुंजाराव काळे,कैलास बाबाराव नागरे व रवी बाबाराव नांगरे यांच्या गौठयाला आग लागली पंचनामा तलाठी राठोड मॅडम व पोलीस पाटील बी.एम.काळे यांनी केला असता त्या मध्ये ज्ञानेश्वर काळे यांच्या घराचे खाण्यापिण्याचे सामान घरातील फर्निचर अंदाजे २५०००० नुकसान झाले व फकीर गुंजाराव यांचे ३ पोते मुंग शेतीचे शेतीऔजार २ स्पीगलरचे सट टिन पत्रे अंदाजे २१०००० नुकसान झाले कैलास नागरे यांचे टिन पत्रे शेतीचे औजार १५०००० रवी बाबाराव नांगरे यांचे टिन पत्रे शेतीचे ठिबक १२०००० प्रल्हाद भाऊराव नागरे यांचे टिन पत्रे ठिबक ५०००० नुकसान झाले आहे. गावाच्या चोह बाजुनी घणदाट जंगल आसल्याने जंगलाला मागील एक महिन्यात सुमारे चार वेळा वणवा पेटला होता.यासाठी वनविभागाने काही उपाय योजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. नुकसानग्रस्तांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

## बुलढाण्यातील चिखलीत काँग्रेसकडून दहशतवाद्यांचे प्रतिकात्मक पुतळा जाळून तीव्र आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर बुलढाण्यातील चिखली येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर काँग्रेसकडून दहशतवाद्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करत तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करत, पाकिस्तान मुर्दाबाद निषेध करणारे फलक हातात घेऊन काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. यावेळी भारत माता की जय, मुर्दाबाद मुर्दाबाद पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या आहे. ज्यांनी हे कृत्य केलं त्यांना धडा शिकवला गेला पाहिजे. आणि केंद्र सरकार ने त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, सरकार जी ही कारवाई करेल आम्ही देशवासी म्हणून त्यांच्या मागे आहोत. अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी दिली आहे.

## शासकीय आरोग्य योजनांपासून वंचित ठेवणाऱ्या रुग्णालयांची चौकशी करा

### माजी आ. संजय रायमुलकर यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आयुष्यमान भारत योजना यासारख्या योजनां पासून सामान्य नागरिकांना वंचित ठेवणाऱ्या मेहकर विधानसभा मतदारसंघातील पॅनल वरील रुग्णालयांची सर्वंकष चौकशी करण्याची मागणी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केली आहे.

पैसे नाहीत म्हणून वैद्यकीय उपचारापासून कोणीही वंचित राहू नये या शासनाच्या उद्देशाला हरताळ फासण्याचे काम योजनांच्या पॅनल वरील काही रुग्णालय करत आहेत. महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत योजना यामध्ये असंख्य आजारांवर उपचारासाठी पाच लाख रुपयांपर्यंत प्रतिवर्ष शासनाकडून मदत मिळते. मात्र मेहकर विधानसभा मतदारसंघातील शासकीय योजनांच्या पॅनल वरील रुग्णाये रुग्णांकडून लाखो रुपये भरून घेत असून योजनांच्या लाभापासून त्यांना वंचित ठेवत आहेत, असा आरोप माजी आमदार संजय रायमुलकर यांनी केंद्रीय पियूष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना पाठविलेल्या पत्रातून केला आहे.

अनेक नागरिकांनी माजी आमदार संजय रायमुलकर यांच्याकडे अशी तक्रारी केल्या की, आमची परिस्थिती बेताची आहे. शासकीय आरोग्य योजनांच्या निकषांमध्ये आम्ही पात्र असूनही पॅनल वरील रुग्णालये उपचारासाठी लाखो रुपये भरून घेत आहेत. रुग्णांकडून आधी योजने संबंधी लाभासाठी सर्व कागदपत्रे ही रुग्णालये जमा करून घेतात आणि काही वेळाने तुम्ही योजनेत बसत नाही असे सांगून लाखो रुपयांची मागणी करतात. या प्रकारामुळे रुग्णालय रुग्णांकडूनही पैसे वसूल करतात आणि अशी ही माहिती प्राप्त झालेली आहे की, रुग्णांनी दिलेल्या कागदपत्रांच्या आधारे शासकीय आरोग्य योजनांपोटी शासनाकडे रुग्णांची बिले सादर करून मोठ्या रकमांची वसुली करत आहेत, असेही रायमुलकर यांनी पत्रात म्हटले आहे.

पॅनल वरील रुग्णालयांनी शासनाकडून गेल्या वर्षभरात कोणकोणत्या रुग्णांच्या नावे रकमा वसूल केलेल्या आहेत, रुग्णांकडूनही या रुग्णालयांनी किती रक्कम वसूल केलेली आहे याबाबतची वरिष्ठ पातळीवरून विशेष चौकशी समिती नेमून चौकशी करण्याची मागणी रायमुलकर यांनी केली आहे. पॅनल वरील रुग्णालयांनी इतरही दवाखाने आपल्याशी संलग्न करून रुग्ण इकडून तिकडे पाठविण्याची आणि त्यांच्याकडून अवाच्या सव्वा रकमा वसूल करण्याचा गोरख धंदा सुरू केलेला आहे, असा आरोपही या पत्रातून करण्यात आला आहे. शासकीय आरोग्य योजनांचा मोठा प्रचार होत असला तरी प्रत्यक्ष पॅनलवरील रुग्णालय गोरगरिबांना याचा लाभ मिळू देत नाहीत फक्त स्वतःची घरे भरण्याचा ते प्रयत्न करत आहेत .यामुळे शासन बदनाम होत आहे ,असे सांगून शासनाने त्वरित चौकशी समिती नेमून याबाबतची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांचा परतीचा प्रवास सुरू

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकार : जम्मू काश्मिरवरून विशेष रेल्वे दिल्लीकडे रवाना

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जम्मू कश्मीर येथे अडकून पडलेल्या पर्यटकांना सुखरूप घरी परत आणण्यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी पुढाकार घेत त्यांना स्वतः रेल्वेत बसवून दिल्लीकडे रवाना केले आहे.

जम्मू कश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांना लक्ष करत दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता. या घटनेनंतर अनेक पर्यटक जम्मू-





काश्मीरमध्ये अडकून पडले होते. त्यांना सुखरूप घरी पोहोचवण्यासाठी सरकारने सर्वतोपरी मदत कार्य सुरू केले आहे. या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने विशेष रेल्वे सोडण्यात आली.बुलढाणा जिल्ह्यातील अनेक पर्यटक हे जम्मू काश्मीर येथे गेले होते. त्यांना सुखरूप परत आणण्यासाठी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी स्वतः पुढाकार घेत पर्यटकांना दिल्ली जाणाऱ्या रेल्वेमध्ये बसवून दिले आहे. अडकलेल्या पर्यटकांना रेल्वे स्थानकावर आणून रेल्वे गाडीत बसून देण्याचे काम केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला आहे. हे सर्व पर्यटक दिल्लीला येणार आहे. त्यानंतर त्यांना त्यांच्या गावाकडे जाणाऱ्या रेल्वे मार्गाने पाठवण्यात येणार आहे. यासाठी केंद्र सरकारच्या वतीने रेल्वेमध्ये विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे आता हे पर्यटक आपल्या गावी सुखरूप पोहोचणार आहेत.